# पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.

---

प्रेसनोट

## मेट्रो प्रकल्पाच्या कामामुळे पीएमपीएमएल बसेसच्या बाणेर रस्त्यावरील संचलनात दि. १२ ते १५ ऑगस्ट २०२३ दरम्यान तात्पुरता बदल

मेट्रो प्रकल्पाचे शिवाजीनगर ते हिंजवडी माण फेज ३ या मार्गावरील काम सुरू असल्यामुळे सोमेश्वर वाडी फाटा ते महाबळेश्वर हॉटेल बाणेर पर्यंत मेट्रोच्या कामाकरीता दिनांक १२ ते १५ ऑगस्ट २०२३ या चार दिवसांच्या कालावधीमध्ये बाणेर रस्ता बंद ठेवण्यात येणार आहे. परिणामी बाणेर रस्त्यावरून संचलनात असलेले बस मार्ग क्र. ११४, २०८, २५६, २५८ व ३६० या बस मार्गांच्या वाहतुकीमध्ये तात्पुरत्या स्वरूपात बदल करणेत आला आहे.

बस मार्ग क्र. ११४, २०८, २५६, २५८ व ३६० या बस मार्गांवरील बसेस बाणेरकडे जाताना बाणेरफाटा चौकातून उजवीकडे वळून सर्जा हॉटेल, औंध आयटीआय, परिहार चौकातून पुढे डावीकडे वळण घेऊन डीपी रोडने आंबेडकर चौक येथून उजवीकडे वळण घेऊन मिडी पॉईंट हॉस्पिटल पासून डावीकडे वळण घेऊन लिंकरोडने सरळ पुढे ताम्हाणे चौकातून डावीकडे वळण घेऊन कपिल मल्हार चौकातून बाणेर बस थांब्यापासून पुढे पूर्ववत बस मार्गाने बसेसचे संचलन सुरू राहील.

तसेच दिनांक १६ ऑगस्ट २०२३ पासून सर्व बस मार्ग पूर्ववत संचलनात राहतील, याची सदर मार्गांनी प्रवास करणाऱ्या प्रवाशांनी नोंद घ्यावी.

**sd/-**
चिफ ट्रान्सपोर्ट मॅनेजर (ऑपरेशन)
पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.

---

दि. १०/०८/२०२३

मा. संपादक,
दैनिक ..........
यांजकडेस...

महोदय,

वरील प्रेसनोट नागरिकांच्या माहितीसाठी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिद्ध होणेविषयी विनंती आहे.

मा. स. कळावे.

**sd/-**
कामगार व जनता संपर्क अधिकारी
पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.